# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

**विषय : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रुवारी-मार्च २०१८ परीक्षा वेळापत्रकाबाबत...**

## प्र क ट न

---

फेब्रुवारी-मार्च २०१८ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१०वी) घेण्यात येत आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (पुनर्रचित व जुना अभ्यासक्रम) लेखी परीक्षा **दि.२१ फेब्रुवारी २०१८ ते २० मार्च २०१८** तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा **दि.०१ मार्च २०१८ ते २४ मार्च २०१८** या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

इ.१२ वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा **दिनांक ०१/०२/२०१८ ते दिनांक १७/०२/२०१८** तसेच इ.१०वी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व कलचाचणी **दिनांक १०/०२/२०१८ ते दिनांक २८/०२/२०१८** या कालावधीत आयोजित करण्यात येत आहेत.

इ.१२वी स्टेनोग्राफी, इ.१०वी दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयांची परीक्षा तसेच इ.१२वी व इ.१०वी आऊट ऑफ टर्न परीक्षा यांचा सविस्तर कालावधी छापील वेळापत्रकात देण्यात आलेला आहे.

**परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे विभागीय मंडळामार्फत छापील स्वरुपात दिलेलेच वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने किंवा खाजगी यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सॲप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

(कृष्णकुमार पाटील)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४

---

पत्र क्र. नाविमं / पमा / 549
नागपूर दि. 08/02/2018

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य
मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

उपरोक्त प्रकटन विद्यार्थी, पालक व शिक्षकांचे निदर्शनास आणून दयावे.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर